DISTRICT AND SESSIONS COURT, JALNA

Survey No - 488, Bypass Road, Jalna 431203

Web-https://jalna.dcourts.gov.in/ Email - mahjaldc@mhstate.nic.in

जिल्हा न्यायालय जालना/संगणक/ निविदा/ —— /२०२६ दिनांक - / ०६/२०२६

जाहीर निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय जालना, दिवाणी न्यायालय व.स्तर, जालना व मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय जालना, अति.जिल्हा व सत्र न्यायालय अंबड, दिवाणी न्यायालय व.स्तर अंबड, दिवाणी न्यायालय क.स्तर अंबड, घनसावंगी, परतूर, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर येथील खालीलप्रमाणे नमुद प्रिंटरसाठी अटी व शर्तींच्या अधीन राहून **Compatible Toner Cartridge पुरविणेसाठी दरपत्रक** मागविण्यात येत आहे.

अ.क्र.	प्रिंटरचा तपशील	प्रिंटरची संख्या
1	Kyocera Ecosys M2040 dn	41
2	Canon LBP 151 dw	69
3	HP Laser Jet P 1007	3
4	HP Laserjet P 1566	6
5	HP Leaserjet 1020 Plus	25
6	HP Leaserjet M202 DW	7
7	Canon-MF 465	39
8	Canon LBP- 246 dw	80
	Total	**270**

सदर दर करार हा त्या त्या न्यायालयातील उपरोक्त प्रिंटरमध्ये Compatible Toner Cartridge खरेदीसाठी करण्यात येणार आहे.

सदरबाबत पुरवठाधारकाने निविदा या मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जालना यांचे नांवे अग्रेषित मोहरबंद लखोटयात दिनांक २२-०६-२०२६ रोजीपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेपर्यंत म्हणेजच सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या कार्यालयात सादर कराव्यात. तद्नंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रकाचा प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

सदर निविदा/दरपत्रक लखोटयावर "**Compatible Toner Cartridge साठी वार्षिक करार करणेबाबत दरपत्रक**" असा ठळक अक्षरात उल्लेख करावा. हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रके स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखून ठेवत आहे.

अटी व शर्ती

१. मोहरबंद/सीलबंद लखोटयावर "**Compatible Toner Cartridge साठी वार्षिक करार करणेबाबत दरपत्रक**" असा ठळक अक्षरात उल्लेख करावा व ती खालील नमुन्यातच जिल्हा व सत्र न्यायालय जालना येथे सादर करावीत.

अ.क्र.	प्रिंटरचा तपशील	प्रिंटरची संख्या	**प्रति प्रिंटर** Compatible Toner Cartridge **चा दर**
1	Kyocera Ecosys M2040 dn	41	
2	Canon LBP 151 dw	69	
3	HP Laser Jet P 1007	3	
4	HP Laserjet P 1566	6	
5	HP Leaserjet 1020 Plus	25	
6	HP Leaserjet M202 DW	7	
7	Canon-MF 465	39	
8	Canon LBP- 246 dw	80	
	Total	**270**	

२. दरपत्रकातील/ निविदेमधील नमूद दर हे सर्व करांसहित राहतील. सदरील दर हे दरपत्रक स्विकारल्यावर १ वर्षासाठी अस्तीत्वात राहतील.

३. प्रिंटर टोनर कार्टरिजची मागणी केल्यानंतर पुरवठाधारकाने पुर्वीचे रिकामे झालेले टोनर कार्टरिज पुरवठाधारक वापस नेऊ शकतील त्यामुळे दरपत्रकात दर नमूद करतांना सदरील बाबीचा विचार करुनच कमीत कमी दर आकारुन दरपत्रके सादर करावीत.

४. तसेच ज्यावेळेस टोनर कार्टरिजची मागणी करण्यात येईल त्यावेळेस सील असलेले टोनर कार्टरिजच स्विकारण्यात येतील. रिफील केलेले किंवा सील नसलेले कोणतेही कार्टरिज स्विकारण्यात येणार नाहीत.

५. दर करार केल्यानंतर टोनर कार्टरिज उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेवर/ पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

६. ज्या न्यायालयाचे /आस्थापनेमध्ये टोनर कार्टरिज पुरविण्यात आलेले आहेत त्या ठिकाणी Service Call Report तयार करुन त्याची एक प्रत संबंधित आस्थापनेस देण्यात यावी व एक प्रत पुरवठाधारकाने हस्तगत करावी. जिल्हा न्यायालयात देयक सादर करतांना याबाबतचा तपशील देयकासोबत सादर करावा लागेल.

७. सदर करारापोटी देय रकम एका वर्षात चार हप्त्यात म्हणजेच तिमाही स्वरुपात अदा करण्यात येईल. तसेच प्रशासकीय कारणास्तव देयकास विलंब झाल्यास कोणताही विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

८. प्रिंटरचे बसविण्यात येणारे टोनर कार्टरिज हे दर्जेदार व उच्च प्रतीचे असावेत. टोनरचा पुरवठा केल्यानंतर पेपरवरील प्रिंटींग पुसल्या जात असल्याचे निर्दशनास आल्यास ते प्रिंटर टोनर कार्टरिज स्विकारण्यात येणार नाही व ते बदलून देण्याची सर्वस्वी जवाबदारी टोनर पुरवठाधारकावर राहील तसेच पुन्हा तोच टोनर पुरवठा केल्यास त्याचा मोबदला देण्यात येणार नाही.

९. कोणतेही दरपत्रके स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा हक्क जिल्हा न्यायालय खरेदी समिती जालना हे राखून ठेवीत आहे.

१०. प्रत्येक पुरवठाधारकाने फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

११. टोनरची मागणी नोंदविल्यानंतर २४ तासांच्या आत पुरवठाधारकास त्या त्या आस्थापनेच्या ठिकाणी टोनर कार्टरिज उपलब्ध करुन द्यावे लागेल. नमूद आस्थापनेच्या ठिकाणी जाण्यासाठी कोणताही भत्ता किंवा वाहन जिल्हा न्यायालयाद्वारे पुरविण्यात येणार नाही.

१२. बदलण्यात आलेल्या टोनर कार्टरिजमध्ये दोष आढळून आल्यास /काही दोष उत्पन्न झाल्यास तो तात्काळ बदलून द्यावा लागेल.

१३. वार्षीक देखभाल/दुरुस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर जसे की GST, Income Tax, etc. दरपत्रक मंजूर झालेल्या संबंधित व्यवसायिकाला/सेवापुरवठादाराला सोसावे लागतील या कार्यालयाकडून सदर प्रकारचे कोणतेही कर संबंधितास अदा करण्यात येणार नाहीत.

१४. करारानुसार काम न केल्यास किंवा अटीचे उल्लंघन केल्यास काणेत्याही टप्यावर कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता आपला वार्षिक देखभाल/दुरुस्ती करार संपूर्णतः रद्द करण्याचे अधिकारी जिल्हा न्यायालय जालना यांना राहतील.

१५. दरपत्रक लिफाफामध्ये सादर करावयाची कागदपत्रे - पॅनकार्डची प्रत, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

१६. सदरची जाहिर निविदा जिल्हा न्यायालय जालनाच्या संकेतस्थळावर (https://jalna.dcourts.gov.in) वर प्रसिध्द करण्यात येईल.

१७. निविदाधारकांनी निविदा जिल्हा न्यायालय जालना येथे दिनांक २२-०६-२०२६रोजीपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) सायंकाळी ६-०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

आदेशावरुन

प्रबंधक
जिल्हा न्यायालय जालना.

दिनांकः- /०६/२०२६